केंद्र शासनाचा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४(१) (ब) नुसार जनतेस प्रसिद्ध करावयाची नियम पुस्तिका (मॅन्यूअल)

कलम ४(१) (ब) (२)

(मॅन्यूअल ३)

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रिय कार्यालय, प्रशासन विभाग, निगडी या सार्वजनिक प्राधिकरणाच्या प्रशासकिय कार्यालयातील निर्णय प्रक्रियेसाठी अनुसरली जाणारी पध्दत पर्यवेक्षण आणि जबाबदारी क्षेत्रिय अधिकारी

| अ. क्र | अधिकार आणि त्यास अनुसरुन कर्तव्ये | कोणत्या आदेश अथवा परिपत्रकानुसार |
|---|---|---|
| १ | महानगरपालिका मंडई, बाजारात अंमलात असलेल्या कोणत्याही नियमांचे, उपविधीचे किंवा स्थायी आदेशांचे उल्लंघन केल्याबद्दल ज्या कोणत्याही व्यक्तीस किंवा तिच्या नोकरास सिध्दअपराध ठरविण्यात आले असेल तिला अशा कोणत्याही मनपा मंडई बाजारातुन काढुन टाकता येईल आणि अशा व्यक्तीने स्वत: किंवा तिच्या नोकरदाराकडून अशा मंडई बाजारात यापुढे कोणताही व्यापार किंवा धंदा चालविण्यास किंवा त्यात कोणताही गाळा, दुकान, उभ्याने माल विकण्याची जागा, टपरी किंवा अन्य जागा याचा भोगवटा करण्यास त्या व्यक्तीस प्रतिबंध करता येईल. आणि व्यक्तीचा कोणत्याही गाळयात, दुकानात, उभ्याने माल विकण्याचे जागेत जो कोणताही पट्टा किंवा धारणाधिकार असेल असा पट्टा किंवा धारणाधिकार समाप्त करता येईल. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्रं. प्रशा/1/कावि/777/95/ दिनांक 26/10/1995 अन्वये |
| २ | जर एखाद्या व्यक्तीकडुन निष्काळजीपणामुळे किंवा चुकुन कोणत्याही सार्व. रस्त्यात किंवा नगरपालिकेच्या बाजारामध्ये किंवा जागेत किंवा सार्व. जागेत किंवा मनपामध्ये निहित असलेल्या इमारतीमध्ये किंवा कोणत्याही रस्त्यावरील महापालिकेच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेची मोडतोड दुरुस्त करण्यास येणारा खर्च वसुल करणे. | वरील प्रमाणे |
| ३ | महापालिकेची शाळा, मैदान भाड्याने देणे, त्यासाठी अनामत म्हणुन घेतलेली रक्कम आवश्यक या बाबीची पुर्तता केल्यानंतर परत करणे. | मा.आयुक्त सो.यांचेकडील परिपत्रक क्र.भूजि/१/कावि१५६/२०१३ दि.२०/०४/२०१३ |
| ४ | कोणतीही नाली, वायुविजनाचा दांडा किंवा नळ, मलकुडी, जलधौत संडास, संडास शौचकुप किंवा मुतारी किंवा स्नानाची जागा किंवा धुण्याची जागा किंवा तिच्याशी जोडलेली जाली आच्छादन किंवा अन्य जोडणीकामी किंवा साधन या संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ मधील कलम 186 (1) अबकडईफग (2) मध्ये असलेल्या तरतुदी नियम किंवा उपविधी यांचे उल्लघंन करण्याच्या किंवा मंजूरी न घेता केलेल्या कृत्यांना मनाई करणे. | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.वरील १ प्रमाणे |
| ५ | जलधौत संडास इ. खराबन करणे किंवा ते अयोग्य रितीने दुषीत न करणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 187 (1) (2) मधील तरतुदीचे उल्लंघन करणा-या विरुध्द कारवाई करणे. | वरील प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| ६ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ प्रकरण 18 नियम 290 (अ) शहंरातील सर्व कच-यांचे डबे व कच-याच्या पेटया यातील कचरा काढून नेणे आणि धुळ, राख अधिनियमाच्या तरतुदीमुळे तरतुद केलेल्या किंवा नेमुन दिलेल्या सर्व जागेत साचलेल्या पदार्थ काढुन टाकणे. | वरील प्रमाणे |
| ७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 292 नुसार केरकचरा इ. कच-याचे डबे कच-याच्या पेटया व जागा यांची तरतुद करणे व नेमून देणे | वरील प्रमाणे |
| ८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 293 नुसार मलमुत्र व दुषित पदार्थ गोळा करणे इत्यादीसाठी तरतुद करणे. | वरील प्रमाणे |
| ९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 294 (1) नुसार विवक्षीत जागामंध्ये स्वच्छता विषयंक खास व्यवस्था करणे व कलम 294 (2) नुसार महापालिंकेने वेळोवेळी ठरविलेल्या दरानुसार रक्कम वसूल करणे. | वरील प्रमाणे |
| १० | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 296 नुसार स्वच्छताविषयंक प्रयोजनासाठी जागांची पहाणी करण्याचा अधिकार | वरील प्रमाणे |
| ११ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 297 नुसार कोणत्याही इमारत स्वच्छतेच्या प्रयोजनासाठी साफ करण्यास फर्मावणे. | वरील प्रमाणे |
| १२ | कैफियत जबाब अँफीडेव्हीट लेखी स्वरुपात तयार करुन त्यावर स्वाक्षरी करुन न्यायालयात सादर करणे. | वरील प्रमाणे व मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/११७५/२०१३, दि.२९/०८/२०१३ |
| १३ | गट अ व ड मधील अधिका-यांची किरकोळ अर्जित व इतर सर्व प्रकारच्यां रजा मंजूर करणे | वरील प्रमाणे |
| १४ | गट क व ड मधील कर्मचा-यांचे बाबतीत मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 56(2) ड मधील पोटकलम (ड) दंड करणे (इ) महापालिकेच्या कोणत्याही आर्थिक हानीची रक्कम पूर्णत: किंवा वेतनातून वसूल करणे | वरील प्रमाणे |
| १५ | गट अ व ड कर्मचा-यांना वेतननिश्चीती करणे | वरील प्रमाणे |
| १६ | गट अ व ड मधील अधिका-याची नियमीत वेतनवाढ मंजूर करणे. | वरील प्रमाणे |
| १७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 81 इ. आयुक्तास दिवाणी न्यायालयाच्या असलेल्या शक्ती, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 81 (ह) अधिकारतेस प्रतिबंध मुंबई प्रांतिक महापालिक अधिनियम 1949 चे कलम 81 (आय) विनियमय करण्याची शक्ती मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 चे कलम 81 (जृ) या प्रकराणातील शक्तीचा विधी संमत वापर करताना अडथळा आणल्याबद्दल शास्ती | मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्र.प्रशा/१/कावि/७७७/९५, दि.२६/१०/१९९५ |
| १८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 332 (अ) प्रमाणे महापालिका मंडई बाजार आवारातील कोणत्याही गाळा दुकान उभ्याने माल विकण्याची जागा यांचा भोगवटा किवा वापर करण्याबद्दल स्थायी समितीच्या मान्यतेने भाडयाने फी आकारणे. | वरील प्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | स्थायी समितीच्या उमेदमान्यतेवर | |
| १९ | स्थायी समितीच्या मान्यतेने आकारणी योग्य असलेले दुकान, भाडे आणि फी किंवा त्यांचा कोणताही भाग एकावेळी एका वर्षापेक्षा अधिक होणार नाही अशा कोणत्याही कालावधीसाठी मक्त्याने देणे (कलम 332 (ब) प्रमाणे ( स्थायी समितीचे उमेदमान्यतेवर) | वरील प्रमाणे |
| २० | क्षेत्रिय कार्यालयांचे नियंत्रणाखाली स्थापत्य, अतिक्रमण,पाणीपुरवठा जलनिसा:रण विद्युत, आरोग्य विषयक कामकाज सोपविणेत आले आहे. या कामकाजाकरिता नियुक्त करणेत आलेल्या सर्व कर्मचा-यांचे कामकाजावर क्षेत्रिय अधिकारी क्षेत्रिय अधिकारी क्षेत्रिय कार्यालय यांचे प्रशासकिय नियंत्रण राहील. | मा.आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/825/95 दिनांक 14/11/1995 अन्वये<br>मा.आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/2/कावि/05/2016 दिनांक 02/01/2016<br>मा.आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/2/कावि/460/2017 दिनांक 07/08/2017 |
| २१ | वित्तीय अधिकार-प्रशासन विभागासाठी१)र.रू.१० लक्ष पर्यंतची विकास कामे, देखभाल दुरूस्ती करणे खरेदीसाठी प्रशासकिय व वित्तीय मंजूरीचे अधिकार २)कार्यालयीन वापरासाठी र.रू.१०,०००/-स्थायी अग्रिमधन बिल मंजुर करणे<br>३)वाहन इंधनासाठी र.रू.२०,०००/- मंजूर करणे<br>४)र.रू.२,००,०००/- मर्यादेपर्यंतच्या कार्यालयीन खर्चासाठी आवश्यक ती सामुग्री/सल्लागार खर्च/संगणक .स्टेशनरी व संगणक साहित्य विकत घेणे,कामकाजाचे आदेश देणे, बिल मंजूर करणे | मा. आयुक्त यांचेकडील दुरूस्ती आदेश लेखा/1अ/कावि/572/2018 दिनांक 23/05/2018<br>लेखा/1अ/कावि/1032/9411/2018 दिनांक 23/05/2018 |
| २२ | गट क व ड कर्मचा-यांच्या परावर्तीत अर्धवेतनी, क्षयरोग, पक्षघात, विकलांगत, प्रस्तुती व गर्भपात, कुष्ठरोग इ.विशेष रजा मंजूर करणे. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013 |
| २३ | वाहन कर्ज, घरबांधणी कर्ज मंजूर करणेत आलेल्या कर्मचा-यांशी महापालिकेच्या वतीने करणेत येणा-या करारनाम्यावर स्वाक्षरी करणे | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013 |
| २४ | गट क व ड मधील कर्मचा-यांचे रजा प्रवास भत्ता मंजूर करणे. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/437/96 दिनांक 21/12/1996 अन्वये |
| २५ | महापालिका सभेत उपस्थित राहण्याचा व तीत होणा-या चर्चेत भाग घेण्याचा अधिकार | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/1101/96 दिनांक 21/12/1996 अन्वये |
| २६ | मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम 1949 मधील कलम 56 (2) (ब) नुसार गट ब,क व ड मधील अधिकारी/ कर्मचारी यांची एक वेतनवाढ स्थगित करणे. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/1175/2013 दि.29/08/2013 |
| २७ | र.रु. 10,00,000/- कमाल मर्यादेपर्यंत खर्च अंतर्गत असलेल्या स्थापत्य, पाणीपुरवठा, विद्युत व आरोग्य विषयक कामांचे संदर्भात सक्षम समिती मार्फत प्रशासकीय मान्यता घेणेची कार्यवाही करणे व प्रशासकीय मान्यतेसाठी पाठवावयाचे विषय पत्रावर स्वाक्षरी करणे व निविदा मागविलेनंतर एक किंवा दोन निविदा उघडावयाच्या किंवा नाही याबाबत निर्णय घेणे.अनामत/बयाणा रक्कम जप्त करणे व दंडात्मक कारवाई करणे. | आदेश क्र.लेखा/1अ/ कावि/565/2014 दिनांक 12/08/2014 प्रपत्र अ अन्वये |
| २८ | महापालिकेच्या जागांतून व्यक्तीना काढुन टाकण्याचा अधिकार | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/515/97 दिनांक 30/07/1997 अन्वये |

| | | |
|---|---|---|
| २९ | नियंत्रणाखालील सर्व गट अ व ब अधिका-यांकडुन कामकाज, वर्तन इ.बाबत नोटिस देऊन खुलासा मागविणे. ताकिद देणे. | वरील प्रमाणे |
| ३० | क्षेत्रिय कार्यालयाकडील गट ब ते ड मधील अधिकारी यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,१९४९ चे कलम 56 (2) मधील पोटकलम (ड) नुसार दंड करणे, पोटकलम (ई) नुसार महापालिकेंच्या आर्थिक हानीची रक्कम पुर्णत: किंवा अंशत: वसूल करणे, बेशिस्त वर्तनाबाबत ताकीद देणे, स्पष्टीकरण मागविणे | वरील प्रमाणे |
| ३१ | क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रातील संडास ब्लॉक बांधणेकामी र.रु. 16000/- अनुदान (सबसिडी) देणे. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/424/98 दिनांक 09/06/1998 अन्वये स्वभाअ/2015 प्र.क्र.23/नवि-34 स्वमअ2.0/IHHL/190/23-24 दि.24/05/2023 |
| ३२ | क्षेत्रियामध्ये चालू असणा-या पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाची कामे करणा-या उपअभियंता यांचे दैनंदिन कामकाजावर क्षेत्रिय अधिकारी यांचे प्रशासकिय नियंत्रणाचे अधिकार. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/623/99 दिनांक 05/04/1999 अन्वये |
| ३२ | लायसन्सशिवाय विविक्षीत गोष्टी न ठेवणे आणि विविक्षीत व्यवसाय व कामे न करणे क्षेत्रिय कार्यक्षेत्रापुरते मर्यादित. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/918/02 दिनांक 23/12/2002 अन्वये |
| ३३ | एखाद्या जागेचा वापर करणे हे घातक किवा उपद्रवकारक असेल तेव्हा असा वापर थांबविण्याचे अधिकार, क्षेत्रिय कार्यक्षेत्रापुरते मर्यादित. | वरील प्रमाणे |
| ३४ | महापालिका आस्थापनेवरुन सेवानिवृत्त होणा-या कर्मचारी यांचे खात्यावर शिल्लक असणा-या या अर्जित व अर्धवेतनी रजेचे रोखणीकरण मंजूर करुन अदा करण्याचे अधिकार (गट क व ड) | मा. आयुक्त यांचेकडील प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013 |
| ३५ | महापालिकेच्या विकास आराखडयानुसार विकसीत केलेल्या जागा व्यतिरिक्त क्षेत्रियाचे कार्यक्षेत्रात असणा-या मनपाच्या जागांवर तात्पुरत्या स्वरुपात 11 महिन्याचे कराराने भाजीमंडई, मिनीमार्केट, फ्रुटस्टॉल इ. साठी जागा मंजूरीचे व करार करण्याचे क्षेत्रिय कार्यलयापुरते मर्यादित अधिकार. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/604/05 दिनांक 14/07/2005 अन्वये व मा.आयुक्त यांचेकडील परिपत्रक क्र.भुजि/1/कावि/156/2013 दि.20/4/2013 |
| ३६ | महापालिकेंच्या मालकींची निवासस्थाने महापालिका अधिकारी / कर्मचारी यांना भाडेतत्वावर देण्याबाबत, क्षेत्रिय कार्यक्षेत्रापुरते मर्यादित | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/750/05 दिनांक 27/10/2005 अन्वये |
| ३७ | सार्वजनिक रस्त्यावर कोणत्याही कारणांसाठी मंडप उभारण्यासाठी परवानगी देणे. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/743/06 दिनांक 11/08/2006 अन्वये |
| ३८ | विवाह नोंदणी विषयक कामकाज | महाराष्ट्र शासन, सार्व आरोग्य विभागाकडील अधिसुचना क्रं. एस30/1007/848/प्र.क्र. 284/कुक 2 दिनांक 27/02/2008 |
| ३९ | अतिक्रमण विषयक कर्मचारी नेमणुकीबाबत व प्रभागांतर्गत कर्मचारी बदली करणेबाबत. | मा. आयुक्त यांचेकडील आदेश क्रं. प्रशा/२/कावि/०५/२०१६ दिनांक ०२/०१/२०१६ मा. आयुक्त यांचेकडील प्रशा/1/कावि/1175/2013 दिनांक 29/08/2013 |

## प्रशासन अधिकारी

| अ. क्र. | अधिकार | कोणत्या परिपत्रकानुसार |
|---|---|---|
| १ | आहरण वितरण अधिकारी म्हणुन काम पहाणे ( वेतन बीले, फरक बीले, वैद्य बीले, अति भत्ता बीले, रजा प्रवास भत्ता अदा करणेचे संदर्भात) | मा. आयुक्त यांचेकडील आदेश प्रशा/1/कावि/1175/2013, दि.29/08/2013 |
| २ | किरकोळ रजा वैकल्पीक रजा मंजूर करणे. गट क व ड कर्मचा-यांचे बाबतीत. | वरील प्रमाणे |
| ३ | गट क व ड कर्मचारी 60 दिवसांपर्यंतच्या अर्जित रजा ( सरेंडर रजा, रजा प्रवासभत्यासह मंजूर करणे. | वरील प्रमाणे |
| ४ | गट क व ड कर्मचारी नियमीत वेतनवांढ मंजूर करणे | वरील प्रमाणे |
| ५ | गट क व ड कर्मचा-यांकडुन बेशिस्त वर्तनाबाबत नोटीस, ज्ञापन याव्दारे खुलासा मागविणे ताकीद देणे. गट क व ड कर्मचा-यांचे बाबतीत. | वरील प्रमाणे |
| ६ | सेवानोंद पुस्तकामध्ये रजा मंजूरी, वेतनवांढ मंजूर, शास्ती इ. बाबत नोंदी घेणे. | वरील प्रमाणे |
| ७ | र.रु.500/- पर्यंतच्या आकस्मीक खर्चाची बीले मंजूर करणे. | वरील प्रमाणे |
| ८ | मनपाच्या इमारती मोकळया जागा, मैदान शाळा इत्यादी प्रासंगिक कार्यक्रमासाठी भाडयाने देणे. | वरील प्रमाणे |
| ९ | गट क व ड कर्मचा-यांच्या 30 दिवसापर्यंतच्या अर्जित रजा मंजूर करणे. | वरील प्रमाणे |
| १० | क्षेत्रिय समिती मासीक सभेविषयी संपुर्ण कामकाज पाहणे. | |

क्षेत्रिय अधिकारी
अ क्षेत्रिय कार्यालय
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
निगडी ४११ ०४४